# द्राक्षबागेसाठी डिफ्युजर वापरुन दुष्काळावर मात केली

श्री. विलास विठोबा शेळके

मी तासगांव तालुक्यातील पेड(हजारवाडी) येथील रहिवासी आहे. माझी सव्वा एकर द्राक्षबाग आहे. एकूण १८०० द्राक्षवेली आहेत. बागेला ठिबक सिंचन व्यवस्था आहे.

सन २००२ मधील दुष्काळ व पाणी टंचाई अभूतपूर्व होती. माझे विहीरीतील पाणी नोव्हेंबर अखेर संपले १८०० वेलींसाठी ठिबकद्वारे पाणी देणेसाठी महिना १५ टँकर (म्हणजे एक दिवसाआड टँकर) पाणी लागते. एवढे पाणी विकत आणून देणे मला परवडण्याजोगे नसल्याने वैतागून मी डिसेंबरमध्ये बागेला पाणी बंद केले. शॉक बसून पाने पिवळी पडून गळून पडू लागली. काळ्या मिरी एवढे झालेले द्राक्षमणीही गळून पडू लागले.

अशा निराश मनःस्थितीत असताना मला श्रीराम भूमिगत खत सिंचन तंत्राचे डिफ्यजूरची माहिती समजली मी ही पध्दत समजून घेतली व किमान वेलीतरी जगवाव्यात या हेतुने हाही एक प्रयोग करून पहावा असे ठरवून मोठ्या धाडसाने २५ डिसेंबर २००२ रोजी२००० डिफ्यूजर मी आणले. माझी लागवड ६ X ६ फुटावर असून प्रत्येक वेलीसाठी एक मायक्रो ट्युब आहे. त्या प्रत्येक मायक्रो ट्युबखाली एक याप्रमाणे १८०० डिफ्युजर ५–६ दिवसात बसवून घेतले व त्याद्वारे वेलींच्या थेट मुळांना जमिनीखाली पाणी देण्यास सुरूवात केली. पाण्याचे प्रमाण ५–६ दिवसाला एक टँकर ठेवले व तेवढे पुरेसे असल्याचे दिसून आले.

जानेवारी महिन्यात बाग चांगली सुधारली. पाने व मणी गळणे थांबले. मणी फुगण्यास सुरूवात झाली. बाग वाचल्याची खात्री वाटू लागली. उत्साह वाढला. या सुमारास कंपनीचे प्रतिनिधी बाग पाहणेस आले. त्यांनी पाण्यातून रासायनिक खते देण्यास सांगितले. त्याप्रमाणे सुरूवात केली. फेब्रुवारी महिन्यात मणी नरम पडू लागले. पाण्याअभावी जी बाग सोडून दिली होती ती बाग तर जगलीच शिवाय त्या बागेतून आता मालही मिळणार अशी खात्री मला वाटू लागली. मी माझ्या बागेत केलेला डिफ्यूजर वापर पाहणेसाठी आजूबाजूचे अनेक शेतकरी येऊन जात आहेत. बाग प्रत्यक्ष पाहून त्यांनाही डिफ्यूजरमुळे फायदा होतो हे पटू लागले आहे. बऱ्याच शेतकऱ्यांनी यावर्षी डिफ्यूजर बसविण्याचा विचार केला असल्याचे मला सांगितले आहे. फेब्रुवारीमध्ये ई टिव्ही चे लोक येऊन अन्नदाता या कार्यक्रमासाठी चित्रीकरण करून गेले.

मार्च महिन्यात माल काढला. एकूण उत्पादन ४ टन मिळाले. मला पुन्हा पुन्हा वाटत होते की डिफ्यूजरचा वापर ऑक्टोबर छाटणीपासून केला असता तर या दुष्काळात देखील आणखी उत्पादन उत्तम दर्जाचे मला मिळाले असते. अर्थात उशिरा का होईना, डिफ्यूजर बसविल्यामुळेच माझी बाग वाचली व इतका माल मिळाला.

डिफ्यूजर बसवून, त्यातून जानेवारी ते मार्च या तीन महिन्यात फक्त १७ टँकर पाणी बागेसाठी द्यावे लागले, डिफ्यूजर शिवाय बाग केली असती तर सुमारे ४५ टँकर लागले असते. एक दिवसाआड टँकर मिळविणेसाठी करावी लागणारी खटपट, टँकर मिळणेस उशीर झाला म्हणजे बागेची दुर्दशा डोळ्यादेखत होत असलेली पहावी लागल्याने होणारा मनःस्ताप, या सर्वांमधून माझी सुटका डिफ्यूजर वापरल्यामुळे झाली. कारण ५–६ दिवसाला एक टँकर मिळविणे तसे सोपे होते. डिफ्यूजर वापराने तीन महिन्यात एकूण २८ टँकर वाचले. म्हणजे चालू दराने रु. ९००/– प्रमाणे रु. २५,२००/– इतकी आर्थिक बचत झाली. मी वापरलेल्या १८०० डिफ्यूजरची किंमत तीन महिन्यात पूर्ण वसूल झाली. हे डिफ्यूजर मजबूत व टिकाऊ आहेत. त्यामुळे हेच डिफ्यूजर पुढील १५–२० वर्षे मला वापरता येतील व वर्षानुवर्षे त्यापासून मिळणारे फायदे मी मिळवू शकेन अशी खात्री वाटते.

माल काढून झाल्यावर खरड छाटणी पर्यंतचे बागेचे विश्रांतीचे काळात मी १५ दिवसाला अर्धा टँकर इके अल्प पाणी देत आहे. आता खरड छाटणीचे वेळी डिफ्यूजर काढून त्याखाली शेणखत, सेंद्रीय खते, पेंड इत्यादींचा बेड करून त्यावर पुन्हा डिफ्यूजर बसविणेचे काम चालू केले आहे.

एप्रिल महिन्यात श्रीराम टाईल वर्क्सचे संचालक श्री. विजय जोगळेकर माझ्या बागेला भेट देणेस आले. त्यांना मी सर्व हकिगत सांगितली. त्यांनी मला असे सांगितले की डिफ्यूजर पध्दतीद्वारे होणाऱ्या अनेक फायद्यांपैकी पाणी बचत हा एकच फायदा यंदा तुम्ही घेतला आहे. नवीन वर्षात आणखी मोठे फायदे मिळविणेसाठी डिफ्यूजर बसवून घ्यावे. त्यातून ज्या सूक्ष्म द्रव्यांची (उदा. बोरॉन, मॅग्नेशियम) कमतरता आहे ते समजेल, त्याप्रमाणे त्या सूक्ष्मद्रव्यांचा विद्राव्य स्वरुपात पुरवठा योग्य प्रमाणात करावा. डिफ्यूजर पध्दतीने जे पाणी दिले जाते ते सर्व वेलींना जमिनीखाली वाफशात उपलब्ध होते. वाया जात नाही. त्यामुळे त्या पाण्यातून दिलेली सूक्ष्मद्रव्ये देखील झाडांना पुरेपुर मिळतात. या कारणामुळे डिफ्यूजर पध्दतीने अन्नद्रव्ये व सूक्ष्मद्रव्ये दिली तर सिंचन पध्दतीच्या तुलनेत त्यातही ६० ते ७०% बचत होते. सूक्ष्मद्रव्यांची कमतरता वेळेत भरून काढणेचा फायदा वेलींची रोगप्रतिकारक शक्ती वाढणे, उत्पादनाचा दर्जा सुधारणे व उत्पादनाचे प्रमाण वाढणे असा अनेक प्रकारे होतो व हा फायदा पाणी बचतीचे फायद्यापेक्षा अधिक मोठा होतो.

श्री. जोगळेकर यांनी सांगितल्याप्रमाणे मी नवीन वर्षात डिफ्यूजर द्वारे अन्नद्रव्ये व सूक्ष्मद्रव्यांचा पुरवठा करणार आहे. डिफ्यूजरचा शास्त्रशुध्द वापर करून नवीन वर्षात दर्जेदार व भरघोस सहजपणे मिळणेचा विश्वास मला वाटत आहे.

पाणी टंचाईची अडचण डिफ्यूजर पध्दतीमुळे आता कोणासही जाणवणार नाही. बागा सोडून देणेची वेळ यापुढे कोणावरही येणार नाही. दुष्काळातही भरघोस व दर्जेदार उत्पादन सहज निघू शकेल. सर्व बागायतदार बंधूंना माझे असे आवाहन आहेत की, श्रीराम भूमिगत खतसिंचन तंत्राचे डिफ्यूजरचा वापर द्राक्षबागांसाठी करावा व दुष्काळावर मात करावी.

दि. १६/४/२००३

श्री. विलास विठोबा शेळके
मु. पेड (हजारवाडी), ता. तासगांव,
जि. सांगली.
फोन नं.: ०२३४६-२५२३४८.

---

**डिफ्यूजरसाठी श्रीराम टाईल वर्क्स, मु. पो. खेर्डी, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथे**
**श्री. विजय जोगळेकर किंवा श्री. श्रीकांत फडके यांचे बरोबर संपर्क साधावा.**
फोन नं.: ०२३५५ ऑफिस : २५६२६५,
निवास : श्री फडके : ९७६५०३९३०८, श्री. जोगळेकर : ९४२२४३०१९७ २६०५३१

---